# बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय: एन विभागात स्वच्छतेबाबत विविध योजना राबविण्याबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती

जाहिरात

'एन' विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरीता विविध योजना राबविण्यासाठी **'एन'** विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था, सहकारी सेवा संस्था, अशासकीय संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था (या सर्व संस्थांचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळणे हा असावा) इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरीता तसेच स्वयंसेवकातर्फे योजना राबविण्याकरीता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था | अर्जाचे शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| 1 | रस्ते स्वच्छता योजना | 01 | रु.3630/- अधिक 18 टक्के GST एकूण रु.4,284/- |
| | मॅनिंग आणि मॉपिंग योजना | 04 | |
| | मोटर लोडर योजना | 10 | |

अर्जाचा नमुना **'एन'** विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन)यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **'बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त'** (**BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION**) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि. 02.12.2025 ते दि.09.12.2025, सकाळी 10.30 ते दुपारी 04.00 वाजेपर्यंत व दि.09.12.2025 रोजी दु.12.00 वाजेपर्यंत फक्त यावेळेत मिळु शकतील. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक एन विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. संस्थेने उपरोक्त तिन्ही कामासाठी एकच अर्ज व एकच रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी **'एन'** विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने **'एन'** विभाग कार्यालयात अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.09.12.2025 दुपारी 03.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'एन'**